# राशिभविष्य - मे, २०१८

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक होईल. त्यात अस्थिर, अहंकारी, चंचल, लहरी स्वभाव झाला असेल तर अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. त्यामुळे मित्रद्रोह होण्याची शक्यता आहे. त्यातून आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. रक्तविकार, हृदयविकार असे आजार असणारांनी तर मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. या राशीची मुले अतिशय खोडकर व व्रात्य झाली असतील तर पालकांनी त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्यामुळे नैराश्य येऊन थकवा येणे संभवते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठाचा त्रास सहन करावा लागेल. केवळ उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल व उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. राहूमुळे गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते, पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती अटोक्यात राहील व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. जन्मकुंडलीत योग असतील तर धनलाभ, मान, प्रतिष्ठा, भूमिलाभ अशापैकी काही तरी मिळू शकेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरी वा व्यवसायच करावा. नवीन काही करण्याच्या भानगडीत पडू नये. नुकसान होणे संभवते. जपा. या राशीच्या युवक युवतींचे प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. विवाहेच्छूचे विवाह ठरतील. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काहींना प्रवासयोग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून तसेच जिभेला लगाम घालून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. कारण हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, मानहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, नको त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागणे, बेअब्रू होणे, कारण नसता शत्रुत्व निर्माण होणे अशापैकी घटना असह्य मनस्ताप देण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने शारीरिक आरोग्य फारसे बिघडणार नाही. मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कौटुंबिक सुख लाभेल. बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदाय होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना धनलाभ होणेही संभवते. मानसिक आरोग्यतज्ज्ञांना , आध्यात्मिक कार्यात मग्न असणारांना तसेच द्रव पदार्थ व्यापार असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण राहूमुळे काही मंडळींच्या बंधुसुखात काही कारणाने बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या वक्री शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे, मन सतत अशांत राहणे संभवते. काही मंडळींना कर्ज फेडीची चिंता त्रस्त करील.

शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. या राशीच्या काही मंडळींकडून ढोंगी आचरण होणे संभवते. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. मन:शांतीसाठी " ओम नम: शिवाय " मंत्राचा जप करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्यविषयक चिंता त्रस्त करतीलसे दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र मित्रांशी भांडणे होणे संभवते. तसेच महिन्याचा अखेरचा सप्ताह मनस्ताप देणारा ठरेलसे वाटते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. धनस्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करतील; तर काहींच्या कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते दृढ होतील. ज्या स्त्रियांचा या महिन्यात प्रसूतिकाळ आहे अशांना पुत्र संतती होणे संभवते. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना , कोळसा, लोखंड यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण स्वत:च्या वा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. काही मंडळीना रक्तविकार, त्वचारोग, मुखदंत विकार, मूळव्याध अशापैकी एखादा आजार त्रस्त करील. छोट्या अपघातामुळे हाडमोड होणेही संभवते. तसेच पाणी व वीज यांपासून धोका असल्याने जलप्रवास करू नका. पाण्यात पोहोताना दमछाक होणार नाही, याची काळजी घ्या. भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अध्यात्मात रुची असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. तसेच श्रीगणेश उपासनाही अनुकुल होईल.

**(४) कर्क -** ही चंद्राची स्वत:ची राशी असल्यामुळे या राशीच्या प्रथम स्थानी असलेला राहू अकारण अपमानकारक घटना घडल्यास सूडबुद्धी निर्माण करील. जपा. तसेच या राहूमुळेच वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेसंबंधातील मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. स्थावर खरेदी-विक्री करण्याची इच्छा असेल तर असे व्यवहार पार पडतील. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच कोळसा, लोखंड व्यापार-व्यवसाय असेल तर तो लाभदायक होईल. पण आरोग्यस्थानी वक्री शनि असल्यामुळे छातीचे विकार, वातविकार अशापैकी आजार त्रस्त करतीलसे दिसते. जपा. बेचैन मनस्थिती व चंचल, संतापी स्वभाव झाल्यास वैवाहिक जीवनात गैरसमजामुळे वाद, भांडणे होणे संभवते. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. जपा. भागीदारीत व्यापार व्यवसाय असणारांनी गैरसमज , संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. जलभय , विषभय असल्याने पाण्यापासून जपा. जलप्रवास करू नका. तसेच बाहेरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. बुधामुळे महिन्याच्या पहिल्या सप्ताहात दैनंदिन व्यवहारात अडथळे, अडचणी येतील, वाद होतील; पण नंतर घरीदारी सर्व ठिकाणी अनुकुल परिस्थिती निर्माण करील. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. शुक्र ग्रह पूर्णपणे

अनुकुल असल्यामुळे सर्वच बाबतीत मनोनुकुल व लाभदायक होईल. ही राशी गुरु ग्रहाची उच्च राशी असल्याने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनोनुकुल घटना घडून सुखसमाधान लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या नोकरदार मंडळींना व बौद्धिक, कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या उत्तरार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. आपल्या प्रयत्नात यश येणे शक्य आहे. महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप, विरोध, अडथळे, अडचणी, दिरंगाई, अनारोग्य, कामाचा ताण अशापैकी कारणांनी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्या काळात मनावर संयम ठेवून व सहनशील बनून तसेच जिभेला लगाम घालून आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल, आर्थिक लाभ होतील, काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळींना प्रवासयोग येईल, साहित्यिकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल, पण भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते.. जपा. आपल्या मानी, अहंकारी, संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांनाच चिकाटीने प्रयत्न करून शिक्षणात अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. आरोग्यस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील, काहींना आर्थिक नुकसान सहन करावे लागेल. काहींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल, काहींना चोरी झाल्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागेल. पण हा मंगळ वैद्यकीय संशोधन नोकरी-व्यवसाय असणारांना, यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, औषध विक्रेत्यांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर गायत्री उपासना सुखसमाधान देऊ शकेल.

**(६) कन्या -** सध्या या राशीच्या मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करीत असावी ,असे वाटते. तसेच काल्पनिक चिंता त्रस्त करीत असाव्यात असेही वाटते. शिवाय कशामुळे तरी फसवणूक होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता दिसते. जपा. संततिसुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील; तर कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना त्यांची स्थावरविषयक समस्या त्रस्त करील. पण वैद्यकीय शिक्षण घेत असणाऱ्या या राशीच्या विद्यार्थ्यांना काळ अनुकुल होईल. माता असणारांना मातेच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. वक्री शनीमुळे या राशीच्या मंडळींच्या गृहसौख्यात बाधा येणे संभवते. पण गुरु ग्रहामुळे कुटुंबात काही शुभ घटना घडतील व त्यामुळे गृहसौख्यातील बाधा सुसह्य होईल. धनस्थानी असलेल्या गुरुं ग्रहामुळे आर्थिक लाभ होणेही संभवते. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. वैवाहिक जीवनातील सुखाचे दृष्टीने महिन्याच्या पहिल्या सप्ताहात थोडी बाधा येणे संभवते; पण नंतर सुखसमाधान लाभेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल

असल्याचाच अनुभव येईल. सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोर मंडळींकडून कृपाप्रसाद प्राप्त होईल. काहींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. मात्र महिन्याच्या उत्तरार्धात नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. नोकरीत अधिकारपदावर असणारांनी अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धनाची अपेक्षा करू नये. असा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व सात्विक सुखशांती लाभेल. दररोज नियमितपणे श्रीगणपतीस्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा-** या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असण्याची शक्यता जाणवते. अति भावनाशील मनस्थिती व स्वाभाविक दोषामुळे घरात कोणाशी पटणार नाही. कुटुंबात सतत गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच काही असमाधानकारक घटना घडणेही संभवते. जपा. त्यात भर म्हणून भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काळ बाधक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करा. त्यासाठी काळ अनुकुल आहे. कोणतेही बौद्धिक क्षेत्र असणारांना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, लेखकांना या संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षेत्र किंवा उत्तम नोकरी मिळण्याची शक्यता आहे. महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या एखाद्याला प्रसिद्धी मिळणेही संभवते. शारीरिक आरोग्याचे दृष्टीने पोटविकार त्रस्त करतील. जपा. जीवनसाथीचे विक्षिप्त आचरण, लहरी स्वभाव, पतिपत्नीत होणारे वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील अपेक्षित सुखसमाधान मिळणे कठीण दिसते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. नपेक्षा व्यवसायात अडथळे निर्माण होतील, अनारोग्य होईल, इच्छा अपूर्ण राहतील, नियोजित कार्यात अपयश येईल. जपा. अशा परिस्थितीतही जन्मकुंडलीत योग असतील तर कमी श्रमात धन, अनपेक्षित धनलाभ, वारसा हकाने धनलाभ अशापैकी धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. शासकीय नोकरीत अधिकार पदावर असणारांना कर्तृत्व सिद्ध झाल्यास पदोन्नती, प्रसिद्धी असे काही मिळू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीविष्णूची उपासना करा. दररोज नियमितपणे “विष्णू सहस्रनामाचे “ पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अपेक्षाभंग, आर्थिक संकटे, अनिष्ट घटना, काही मंडळींना कोर्ट प्रकरणाची चिंता अशापैकी कारणांनी कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. अशा प्रतिकुल काळात विचारशक्तीवर संयम ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करा . त्यामुळे होणारा मनस्ताप सहज सुसह्य होईल. अध्यात्माची आवड असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. तृतीय स्थानी उच्च राशीत असलेल्या मंगळ ग्रहामुळे हिम्मत व महत्त्वाकांक्षा वाढेल. आपली कर्तबगारी सिद्ध करण्याच्या नादात इजा, दुखापत होणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण त्यासाठी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. काहींना पोटविकार त्रस्त करील; तर काहींना डोकेदुखी, मेंदूविकार अशापैकी

आजार त्रस्त करण्याची दाट शक्यता दिसते. जपा. वैद्यकीय व्यवसाय, औषध वोक्रेते, यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांनाही संपूर्ण महिण्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कोणतेही बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व संशोधनात्मक कार्यात कार्यमग्न असणारांना ही काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. पण अष्टम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे काहींना कमी श्रमात अपेक्षित अर्थलाभ मिळू शकेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे श्रीगणेश अथर्वशीर्ष व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या वक्री शनीमुळे स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. तसेच कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास गहरे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. काहींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या धनस्थानी असलेल्या मंगळ-केतूमुळे आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पाडावयाच्या याची चिंता त्रस्त करील. येणे असलेली
रक्कम वसूल होणार नाही; पण देणे मात्र कसे द्यावयाचे याची चिंता त्रस्त करील. शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचा आजार त्रस्त करील. नेत्रविकार, मानेचे दुखणे, घशाचे विकार अशापैकी आजार होणे संभवते. अध्यात्म, गूढ विद्या अशापैकी शिक्षणात व उपासनेत प्रगती होईल. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. महिन्याच्या प्रथम सप्ताहात गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. . पण नंतर मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या तर कोणाची अनारोग्यविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र काही मंडळींना ज्ञान व अनुभव असूनही अपेक्षित संधी न मिळाल्याने प्रगती करणे अशक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, ज्यांचे प्रेमसंबंध असतील त्यांचे किंवा अन्य विवाहेच्छूचे विवाह ठरतील किंवा संपन्न होतील. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे विविध मार्गांनी धनलाभ होणे संभवते.
काही मंडळींना नवे मित्र मिळतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती साधणे व यश मिळविणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर मन:शांतीसाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. कारण एकूण सर्वच ग्रहस्थिती प्रतिकुलतेकडेच झुकणारी आहे. म्हणून या राशीच्या मंडळींनी या संपूर्ण महिन्याच्या काळात आपल्या हटटी व मानापमान फार असणाऱ्या स्वभावावर तसेच सर्वच बाबतीत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व अत्यंत सहनशील बनून आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. शिवाय आपली मते व विचारही प्रकट न करता शक्यतो मौन व्रत धारण करावे, असे सांगावेसे वाटते. त्यामुळेच हा प्रतिकुल काळ सुसह्य होईल

व फारसा मनस्तापही होणार नाही. तसेच होणारे अनारोग्यही नियंत्रणात राहील. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, नियोजित कार्यात येणाऱ्या अडचणी व होणारी दिरंगाई, कौटुंबिक त्रास, कोणाशी न पटणे, अनपेक्षितपणे उभे राहणारे खर्च, अन्य चिंता नोकरीत होणारा वरिष्ठाचा त्रास अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. हितशत्रूंपासून सावध राहा. आपल्या आचरणाने कोणाशी शत्रुत्व निर्माण होणार नाही, याकडे लक्ष द्या. सतत तक्रारी करू नका. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने करा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकते. वाममार्ग धनप्राप्तीचा विचारही करू नका. अंगाशी येईल. जपा. या राशीच्या कलावंत मंडळींना मात्र अपेक्षित प्रगती करणे व त्यातून सुखसमाधान मिळविणे शक्य होईल. पण या राशीच्या काही मंडळींना स्वत:जवळ उच्च कलागुण असूनही कलेचे प्रकटीकरण करण्यास योग्य संधी मिळत नाही याचे दु:ख होईल. जपा. पण बौद्धिक नोकरी व्यवसाय असणारांना तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. सध्या शनी ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे याची जाणीव ठेवून सतत नम्रतेचे आचरण करा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे श्रीहनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असावी असे दिसते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. त्यात भर म्हणून स्वभाव अत्यंत लहरी झाला असेल तर नको त्या विचारात भरकटत जाऊन स्वत:ची फसगत करून घ्याल. जपा. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे वाद, भांडणे,
आर्थिक चिंता, मानहानी सहन करावी लागेल. जपा. त्यामुळे अस्वस्थ वाटेल. जपा. कोणाशीही शत्रुत्व निर्माण होणार नाही, याची काळजी घ्या. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अनुकुल असल्याने जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. तशात कौटुंबिक त्रास सहन करावा लागला तर त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे गृहसौख्य लाभेल, मित्रसुख लाभेल, पण धननाश होणे संभवते. जपा. शेतीवाडी असणारांना काळ लाभदायक होईल. सर्व प्रकारच्या कलाकार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास देणारी समस्या त्रस्त करील. ज्यांना अन्य जातीय-धर्मीय मित्र असतील त्यांना अशा संबंधामुळे काळ लाभदायक होईल. पण षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे पोटविकाराचा त्रास होणे संभवते. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, अध्यात्मात रस असणारांना शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनकुल होईल व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर “ओम नम: शिवाय “ मंत्राचा जप करा. तसेच श्री हनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत चंचल व विकृत अशी होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना कुसंगतीची बाधा त्रस्त करील. काही मंडळीना मित्रद्रोहाचा परिणाम भोगावा लागेल. त्यातून आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. अति अस्थिर मन व अविचाराचे आचरण होणे संभवते. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींनी मन, विचारशक्ती व स्वभावदोष यांवर नियंत्रण ठेवून सतत सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. तसेच जिभेला लगाम घालून आचरण करा. नपेक्षा अकारण समोरची व्यक्ती आपल्या फटकळ बोलण्याने दुखावली जाईल व दोघांत दुरावा निर्माण होईल. जपा. धनस्थानी असलेल्या रवि ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात उष्णताविकारांनी अनारोग्य होणे संभवते. विशेष करून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. तसेच वाढता खर्च, त्यात आर्थिक नुकसान झाले तर आर्थिक चिंता त्रस्त करील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल व नोकरीव्यवसायात अनुकुल परिस्थिती निर्माण होईल. नोकरी-व्यवसायात सर्व काही मनासारखे घडून येईल. काही मंडळीना धनलाभ तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. तसेच काहींना मान वा प्रतिष्ठा प्राप्त होईल. हा शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर शेती व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल; तर या राशीच्या युवकांना विवाहयोग देईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण होणे संभवते. पण याच राहूमुळे कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असेल अशापैकी काहींना असा धनलाभ होईल. काहींना काहींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. प्रवासाचे योग येतील. काहींना एखाद्या मौल्यवान वस्तूची प्राप्ती होणे संभवते. गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना केतू ग्रह लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनशांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

======0ooooo0ooooo======